|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade
NAAC Re-Accredited
(3rd Cycle)



## आजीवन अध्ययन व विस्तार विभाग

जा.क्र. कबचौउमवि/१९ /आ.अ.व वि.वि./ व्याख्यानमाला/ ५३/२०२२ **ई.पत्र** दि.२४/०५/२०२२

**प्रति,**
**मा.प्राचार्य/ संचालक/ विभागप्रमुख/समन्वयक**
**कबचौउमविशी संलग्नित असलेली सर्व महाविद्यालये,**
**मान्यता प्राप्त परीसंस्था व विद्यापीठ शैक्षणिक प्रशाळा- विभाग यांना..**

**विषय :-' खान्देशकन्या कवयित्री बहिणाबाई चौधरी ' ऑनलाईन व्याखानमालेत डॉ.गिरीश कुलकर्णी संस्थापक अध्यक्ष स्नेहालय नगर यांचे व्याख्यानास ऑनलाईन उपस्थित राहणेबाबत..**

महोदय, महोदया,

आजीवन अध्ययन व विस्तार विभाग कबचौउमविच्या माध्यमातुन विद्यापीठ परीक्षेत्रातील विविध महाविद्यालय व मान्यताप्राप्त संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने परीसरातील विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा परीक्षा, व्यक्तीमत्व विकास व संवाद कौशल्य अशा विविध विषयांवर तसेच ज्येष्ठ नागरिकांसाठी त्यांच्याशी संबंधित असलेल्या विविध विषयांवर कार्यशाळा व कार्यक्रमांचे आयोजन वेळोवेळी करण्यात येत असते. समाजातील सर्वच घटकांसाठी आजीवन अध्ययन व विस्तार विभागातर्फे समाजाच्या सर्वच घटकांवर परिणाम करणाऱ्या विविध विषयांवर प्रत्येक महिन्यात ऑनलाईन पध्दतीने शिक्षण,कला, क्रिडा, साहित्य, स्पर्धा परीक्षा, समाजकारण, राजकारण, सांस्कृतिक, भारतीय प्रशासन सेवेतील विविध अधिकारी, ज्येष्ठ नागरिक, अर्थकारण व महिलांच्या समस्या अशा विविध विषयांवर समाजात विविध क्षेत्रात कार्यरत असलेल्या मान्यवरांना आमंत्रित केले जाणार असून संबंधित विषयातील तज्ञ व्यक्तींना आमंत्रित करुन ' खान्देश कन्या कवयित्री बहिणाबाई चौधरी ' यांच्या नावाने ऑनलाईन पध्दतीने व्याख्यानमाला कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागातर्फे सुरु करण्यात आली असून याचा लाभ समाजातील विविध घटकांना होणार आहे. या व्याख्यानमालेचे उद्घाटनाचे व्याख्यान यापुर्वी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते पद्मश्री गिरीष प्रभुणे यांचे ' भारताच्या उभारणीत भटके विमुक्तांचे योगदान' व 'ग्रामीण महाराष्ट्रातील प्रतिभा ' या विषयावर टी.व्ही व सिनेअभिनेत्री सुरभी हांडे हिचे तसेच नॅशनल स्पेस सोसायटीचे संचालक,अभियंता श्री.अविनाश शिरोडे यांचे 'कुतूहल अंतराळ विज्ञानाचे ' तसेच मा.श्री.योगेश सोमण, कलावंत, निर्माता, लेखक व दिग्दर्शक यांचे ' स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या स्वप्नातील समर्थ भारत' या विषयावर व्याख्यान संपन्न झाले आहे. व्याख्यान संपन्न झाले आहे.

महाराष्ट्राच्या सामाजिक क्षेत्रात लालबत्ती भागामधील स्त्रिया आणि त्यांची मुले यांच्यासाठी बॅकेत खाते, मुलांना जन्म दाखल्याविणा शाळेत प्रवेशाचा अधिकार, पोलिसांची हप्ताबंदी, आरोग्याचा अधिकार, प्रवेशाचा अधिकार, मोफत कंडोम मिळण्याच्या अधिकार, इतर समान अधिकार - दर्जा आणि प्रतिष्ठा मिळण्यासाठी ज्यांनी भरपूर आंदोलन केले असे स्नेहालयाच्या आरंभीच्या काळात वेश्या व्यवसायातील स्त्रियांना ओळख आणि नागरिकत्व मिळवून देण्यासाठी खूप संघर्ष करणारे १९९३ मध्ये भारतात सर्वप्रथम सर्व वेश्यांना शिधापत्रिका ज्यांच्या प्रयत्नांनी नगर जिल्हयात देण्यात आल्या, असे 'ज्योत से ज्योत जगाते चलो ' याप्रमाणे आपला प्रवास सुरु ठेवणारे ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते व नगर येथील स्नेहालय याचे संस्थापक अध्यक्ष डॉ.गिरीश कुलकर्णी हे खान्देशकन्या कवयित्री बहिणाबाई चौधरी ' व्याख्यानमालेत सोमवार दि.२७ जून २०२२ रोजी दुपारी ०४.०० वाजता 'लैगिकता आणि महिला शोषण' या विषयावर ऑनलाईन पध्दतीने व्याख्यान देणार आहेत.

..२..

सदरचे व्याख्यान झुम-लिंक, यु-टयुब तसेच फेसबुक वरुन समाजातील विविध घटकांना ऐकता येईल व यात व्याख्यान ऐकणाऱ्या श्रोत्यांना व्याख्यात्यांना विषयाशी संबंधित प्रश्न सुध्दा विचारता येतील. विद्यापीठाच्या संकेतस्थळावर व्याख्यानाची लिंक उपलब्ध करुन देण्यात येईल. विद्यापीठाचे पदाधिकारी या कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून उपस्थित राहून मार्गदर्शन करतील. व्याख्यानमालेस आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांना ऑनलाईन पध्दतीने उपस्थित राहण्याविषयी सुचित करावे ही नम्र विनंती.

कळावे!

**आपला विश्वासू,**

**(प्रा.मनिष आर. जोशी)**
**संचालक, आजीवन अध्ययन व विस्तार विभाग**

**प्रत :-** सिस्टीम अर्नलिस्ट, संगणकशास्त्र प्रशाळा, क.ब.चौ.उमवि, जळगाव :- उपरोक्त परिपत्रक विद्यापीठाच्या संकेत स्थळावर प्रकट करावे.

---

**Phone-0257-2257415/416**
**FAX-0257-2258403-406**
**वेबसाईट-nmu.ac.in**
**ई.मेल- directorlllеb@nmu.ac.in**

Registrar KBCNMU, Jalgaon is inviting you to a scheduled Zoom meeting.

Topic: 'खान्देशकन्या कवयित्री बहिणाबाई चौधरी व्याख्यानमाला '

**विषय :-** 'लैंगिकता आणि महिला शोषण'

Time: June 27, 2022 04:00 PM Mumbai, Kolkata, New Delhi

Join Zoom Meeting
https://us06web.zoom.us/j/9199436597?pwd=TE1rSkUycmNDaVBCcURBSmFYMmFWZz09

Meeting ID: 919 943 6597
Passcode: lifelong

हा कार्यक्रम फेसबुकवर लाईव्ह प्रक्षेपित करण्यात येईल.

https://www.facebook.com/profile.php?id=100078043982977